आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
११ ऑगस्ट २०२५ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- सुलभ भाषेत प्राप्तिकर सवलतींचं विवरण करणारं नवीन प्राप्तिकर विधेयक लोकसभेत मंजूर

- प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या ३५ लाखांहून अधिक लाभार्थ्यांना वीम्याच्या दाव्याचं वाटप

- इंडिया आघाडीच्या खासदारांचा नवी दिल्लीत निवडणूक आयोगाच्या कार्यालयावर मोर्चा

- पुणे जिल्ह्यात वाहन दरीत कोसळून झालेल्या अपघातात ८ महिलांचा मृत्यू, २९ जण जखमी, केंद्र आणि राज्य सरकारकडून आर्थिक मदत जाहीर

**आणि**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि युक्रेनचे अध्यक्ष वोलीदिमिर झेलेन्स्की यांच्यात दूरध्वनीद्वारे चर्चा

**<><><><><>**

लोकसभेत आज कर आकारणी कायदे सुधारणा विधेयक, २०२५ आणि नव्यानं मांडलेलं प्राप्तिकर विधेयक, २०२५ ही दोन विधेयकं आवाजी मतदानानं मंजूर झाली. विविध कारणांवरून विरोधकांचा गदारोळ सुरु असताना केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी ही विधेयकं सभागृहात मांडली.

नव्यानं मांडलेलं प्राप्तिकर विधेयक २०२५ हे सहा दशकं जुन्या प्राप्तिकर कायदा, १९६१ ची जागा घेईल. भाजपा खासदार बैजयंत पांडा यांच्या अध्यक्षतेखालच्या संसदीय प्रवर समितीनं सुचवलेल्या २८५ शिफारसींचा यात अंतर्भाव केला आहे. याआधीच्या प्राप्तिकर विधेयकात काही त्रुटी आढळल्यानं सरकारनं ते गेल्या आठवड्यात मागे घेतलं होतं. सुधारित विधेयकात क्लिष्ट भाषा

हटवून सुलभ कर भाषेत प्राप्तिकर सवलतींचं विवरण देण्यात आलं आहे. प्रमाणित वजावट, घराच्या मालमत्तेतून मिळणारं उत्पन्न इत्यादीबाबतचा संभ्रम सोप्या, सरळ भाषेत दूर करण्यात आल्याचं सीतारामन यांनी सांगितलं.

राज्यसभेत आज गोवा विधानसभा मतदारसंघांमधल्या अनुसूचित जमातींच्या प्रतिनिधित्वाचं पुनर्समायोजन विधेयक संमत झालं. लोकसभेनं हे विधेयक गेल्या आठवड्यात मंजूर केलं होतं. विधेयकं मंजूर झाल्यानंतर दोन्ही सभागृहांचं कामकाज दिवसभरासाठी स्थगित झालं. त्याआधी आज सकाळी विरोधी पक्षांनी विविध कारणांवरून गदारोळ केल्यामुळे

दोन्ही सभागृहांचं कामकाज दुपारी दोन वाजेपर्यंत स्थगित करावं लागलं. विरोधक नियोजित पद्धतीनं गदारोळ करत असल्याबद्दल लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी नापसंती व्यक्त केली. करोडो रुपये वाया जात असल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><>

देशात हवाई प्रवासाच्या सुरक्षिततेसाठी नागरी हवाई वाहतूक महासंचालनालयानं गेल्या ५ वर्षात १७१ तपासण्या केल्या असल्याचं आज सरकारने राज्यसभेत सांगितलं. केंद्रीय हवाई वाहतूक राज्य मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी लेखी उत्तरात म्हटलंय की एअर इंडियाच्या बोईंग विमानाला अहमदाबादमधे झालेल्या अपघाताव्यतिरिक्त उड्डाणातल्या व्यत्ययाच्या २ घटना झाल्या तर तांत्रिक बिघाडामुळे तातडीनं विमान उतरावं लागल्याच्या १० घटना झाल्या.

<><><><>

नवी दिल्लीत संसद सदस्यांसाठी बांधलेल्या १८४ सदनिकांचं उद्घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज झालं. बाबा खडक सिंह मार्गावरच्या या संकुलातल्या इमारतींना कृष्णा, गोदावरी, कोसी आणि हुगळी या चार नद्यांची नावं

देण्यात आली आहेत. यावेळी प्रधानमंत्र्यांनी शेंदूर वृक्षाचं रोप लावलं, तसंच या संकुलांचं बांधकाम करणाऱ्या कामगारांशी संवाद साधला.

**<><><><><>**

प्रधानमंत्री पीक विमा योजने अंतर्गत देशातल्या ३५ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना आज तीन हजार ९०० कोटी रुपयांहून अधिक किमतीच्या पीक विमा दाव्यांचं वाटप करण्यात आलं. केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी राजस्थानात झुंझुनू इथं आयोजित कार्यक्रमात रिमोटची कळ दाबून शेतकऱ्यांच्या खात्यात ही रक्कम हस्तांतरित केली. यात महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांना खरिपातल्या नुकसान भरपाईपोटी ८०९ कोटी तर रब्बीसाठी ११२ कोटी असे एकंदर ९२१ कोटी रुपये मिळाले. प्रधानमंत्र्यांनी पीकविमा योजनेत मोठ्या प्रमाणात सुधारणा केली असून २०१६ पासून आतापर्यंत दोन लाख १२ हजार कोटी रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाले आहेत, असं कृषिमंत्री यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

स्वातंत्र्य दिनानिमित्त देशभरात आयोजित केलेल्या हर घर तिरंगा या मोहिमेत देशात आणि परदेशात राहणाऱ्या प्रत्येक भारतीयाने सहभागी व्हावं असं आवाहन केंद्रीय सांस्कृतिक मंत्री गजेंद्र सिंह शेखावत यांनी आज केलं. ते आज नवी दिल्ली इथे पत्रकार परिषदेत बोलत होते. देशभरातले ५ लाखांहून अधिक स्वयंसेवक या मोहिमेत सहभागी होत असल्याचंही शेखावत यावेळी म्हणाले. हर घर तिरंगा मोहिमेअंतर्गत घर तिरंगा हर घर स्वच्छता, प्रश्नमंजुषा, पत्रलेखन, राखी बनवणे अशा विविध स्पर्धांचाही समावेश आहे.

**<><><><><>**

निवडणूक आयोग पक्षपातीपणे काम करीत असल्याचा आरोप करुन, इंडिया आघाडीच्या खासदारांनी आज निवडणूक आयोगाच्या दिल्लीतल्या कार्यालयावर

मोर्चा काढला. बिहारमधलं मतदारयाद्या पुनरिक्षण रद्द करण्याची मागणी मोर्चेकऱ्यांनी केली. पोलिसांनी मोर्चा अडवला तेव्हा आंदोलनकर्त्या खासदारांनी रस्त्यावरच ठिय्या दिला. लोकसभेतले विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांच्यासह अनेक खासदारांना पोलिसांनी ताब्यात घेतलं.

काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार, अखिलेश यादव यांच्यासह अनेक खासदार मोर्चात सहभागी झाले होते.

निवडणूक आयोग आणि सर्वोच्च न्यायालयासारख्या संवैधानिक संस्थांची प्रतिमा विरोधक मलीन करत आहेत असा आरोप केंद्राय संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी केला. आंदोलन करणाऱ्या खासदारांपैकी ३० जणांनी भेटावं अशी परवानगी निवडणूक आयोगानं दिली होती, परंतु आयोगाने सर्वच आंदोलनकर्त्या खासदारांची भेट घ्यावी असा त्यांचा हट्ट होता असं रिजिजू म्हणाले.

<><><><><>

पुणे जिल्ह्याच्या खेड तालुक्यात पोईट इथं आज कुंडेश्वराच्या दर्शनाला चाललेल्या महिला भाविकांचं वाहन दरीत कोसळून ८ जणींचा जागीच मृत्यू झाला, तर २९ जण जखमी झाले. स्थानिकांच्या मदतीनं पोलिसांनी जखमींना चांडोली ग्रामीण रुग्णालय आणि खासगी रुग्णालयात दाखल केलं आहे. अनेक जखमींची प्रकृती गंभीर असल्याचं वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी दोन लाख, तर जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपयांची मदतही त्यांनी जाहीर केली आहे.

राज्य सरकारतर्फे मृतांच्या कुटुंबांना चार लाख रुपयांची मदत मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी जाहीर केली आहे.

जखमींना आवश्यक ती सर्व वैद्यकीय मदत आणि उपचार उपलब्ध करून देण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजीत पवार यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत.

**<><><><>**

राज्य सरकारनं कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात २ टक्के वाढ केली आहे. राज्य सरकारमध्ये कार्यरत अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना तसंच निवृत्ती वेतन धारकांना आता ५३ ऐवजी ५५ टक्के महागाई भत्ता मिळेल. १ जानेवारीपासून या महागाई भत्त्याची थकबाकीही ऑगस्टच्या वेतनासोबत दिली जाईल. यासंदर्भातला शासन आदेश सरकारनं आज जारी केला.

**<><><><>**

देशातल्या शेअर बाजारांनी आज जोरदार तेजी अनुभवली. दिवसअखेर सेन्सेक्स ७४६ अंकांनी वधारून ८० हजार ६०४ अंकांवर तर निफ्टी २२२ अंकांची वाढ नोंदवून २४ हजार ५८५ अंकांवर स्थिरावला. परदेशी संस्थांत्मक गुंतवणूकदार तसंच म्युच्युअल फंडातून होत असलेल्या खरेदीनं बाजारात तेजी दिसून आली.

**<><><><>**

१८वी आंतरराष्ट्रीय खगोलशास्त्र आणि खगोलभौतिकशास्त्र ऑलिम्पियाड आजपासून मुंबईत सुरू झालं. या स्पर्धेचं आत्तापर्यंतचं हे सगळ्यात भव्य स्वरूप असून ६४ देशांमधून एकंदर २८८ विद्यार्थी यात सहभागी झाले आहेत, अशी माहिती होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्राचे संचालक प्राध्यापक अर्णब भट्टाचार्य यांनी दिली. या स्पर्धेचा उद्देश सांगताना आंतरराष्ट्रीय खगोलशास्त्र आणि खगोलभौतिकशास्त्र ऑलिम्पियाडचे अध्यक्ष प्राध्यापक अनिकेत सुळे म्हणाले,

**होल्ड... प्रा. अनिकेत सुळे**

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज युक्रेनचे अध्यक्ष वोलीदिमिर झेलेनस्की यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधला. आणि अलीकडच्या घडामोडींबाबत त्यांचा दृष्टीकोन जाणून घेतला. युक्रेन रशिया संघर्षावर लवकरात लवकर आणि शांततापूर्ण मार्गानं तोडगा निघावा, अशी भारताची ठाम भूमिका असल्याचं झेलेनस्की यांना सांगितलं, असं मोदी यांनी समाजमाध्यमावर म्हटलं आहे. याबाबत शक्य ते सर्व प्रकारचं योगदान देण्यासाठी, तसंच युक्रेनशी असलेले द्विपक्षीय संबध अधिक मजबूत करण्यासाठी  भारत कटीबद्ध आहे, असंही त्यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

अमेरिका आणि रशिया यांच्यात होणाऱ्या संभाव्य युद्धविराम करार चर्चेमध्ये युक्रेन आणि युरोपीय महासंघाचाही सहभाग असला पाहिजे, असं महासंघाचे परराष्ट्रविभाग प्रमुख काजा कल्लास यांनी म्हटलं आहे. यूरोपीय महासंघातल्या परराष्ट्र मंत्र्यांची ऑनलाईन बैठक आज झाली असून त्यात पुढच्या उपाययोजनांवर चर्चा झाल्याचंही त्यांनी सांगितलं. युक्रेनमधल्या युद्धविरामाबाबत चर्चा करण्यासाठी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतीन येत्या १५ तारखेला अलास्कामध्ये भेटणार आहेत.

**//<><><><><>//**